# अन्न उद्योजकतेद्वारे महिला सक्षमीकरण

**वैदेही परेश भागवत**, कमला कॉलेज कोल्हापूर.

---

**सारांश**

अन्न उद्योग हा महिला सशक्तिकरणाचे एक महत्त्वपूर्ण साधन ठरू शकतो. अन्न उत्पादन, प्रक्रिया, विपणन आणि वितरण यामध्ये विविध संधी उपलब्ध आहेत,ज्या महिला आणि युवा महिला वर्गाला आर्थिक स्वातंत्र्य, कौशल विकास आणि व्यवसाय सुरू करण्याची संधी देऊ शकतात. महिलांसाठी अन्न उद्योग एक स्वयंसहाय्य असलेला क्षेत्र आहे ज्यामध्ये त्यांना रोजगार मिळवण्याची, कौशल प्राप्त करण्याची आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्याची संधी आहे.तरुण महिला वर्गाला अन्न उद्योग एक चांगला रोजगार क्षेत्र ठरू शकतो, कारण त्यात कौशल विकासाचे आणि विविध प्रशिक्षणाचे महत्त्व आहे. अन्न उद्योगाच्या माध्यमातून महिलांना लघुउद्योग सुरू करण्यासाठी आणि स्वयंपूर्ण होण्यासाठी मदत मिळू शकते, यामुळे त्यांची सामाजिक व आर्थिक स्थिती सुधारते. तथापि, काही अडचणी जशा की, शिक्षणाची कमतरता, वित्तीय सहाय्याची अनुपलब्धता, आणि सांस्कृतिक अडथळे, त्या पार करण्यासाठी योग्य प्रशिक्षण, कर्ज सुविधा आणि जागरूकतेची आवश्यकता आहे. अन्न उद्योगाद्वारे महिलांना सक्षम बनवून, एक मजबूत आणि स्वावलंबी समाजाची निर्मिती केली जाऊ शकते.

**शब्द संग्रह** –अन्न उद्योजकता, महिला सक्षमीकरण, महिलांसाठी अन्न उद्योगाच्या क्षेत्रातील संधी

**प्रस्तावना-**

आजच्या आधुनिक काळात अन्न उद्योग आणि कृषी क्षेत्र हे अत्यंत महत्त्वाचे क्षेत्र आहेत. भारतीय समाजात, विशेषतः ग्रामीण भागात, अन्न उद्योग हे तरुण महिलावर्ग तसेच महिलांचा आर्थिक, सामाजिक आणि वैयक्तिक विकास करण्यासाठी एक महत्त्वपूर्ण साधन बनू शकतो. भारताच्या अर्थव्यवस्थेत कृषी आणि अन्न प्रक्रिया क्षेत्राचा मोठा वाटा आहे. या क्षेत्रामध्ये कार्य करण्याने महिलांना आणि युवतींना स्वावलंबी होण्याची, नोकरी किंवा व्यवसाय सुरू करण्याची, तसेच त्यांच्या कुटुंबाची स्थिती सुधारण्याची संधी मिळू शकते. यामुळे त्यांचे सक्षमीकरण होऊ शकते. अन्न उद्योग हा भारतीय अर्थव्यवस्थेचा एक महत्त्वाचा भाग आहे. या उद्योगात काम करणारी युवती , महिला आणि युवा यांचे सक्षमीकरण केल्यास देशाच्या आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकासात मोठे योगदान होऊ शकते. अन्न उत्पादन, प्रक्रिया, वितरण आणि विपणन इत्यादी विविध क्षेत्रांमध्ये महिला आणि युवतींना अधिक सक्रियपणे सहभागी करून त्यांना आत्मनिर्भर बनवता येईल. या शोधनिबंधात अन्न उद्योगाच्या माध्यमातून महिला आणि युवतींचे सक्षमीकरण कसे साधता येईल, यावर चर्चा केली जाईल. महिला सक्षमीकरण हा एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक आणि आर्थिक मुद्दा आहे महिलांना समान संधी मिळवून देणे, त्यांचा आत्मविश्वास वाढवणे आणि त्यांना आत्मनिर्भर बनवणे हे महिला सक्षमीकरणाचे मुख्य उद्दिष्ट आहे. अन्न उद्योजकता हे एक महत्त्वाचे क्षेत्र आहे जिथे महिलांना रोजगार, कौशल्य आणि स्वावलंबन मिळवून देणारी संधी उपलब्ध होऊ शकते. अन्न उद्योजकता म्हणजे अन्नाशी संबंधित व्यवसायांची सुरवात.उत्पादन, प्रक्रिया आणि विक्री यामध्ये महिला सक्रियपणे भाग घेऊ शकतात. जागतिक गुंतवणुकी दारांसाठी भारत हा एक उद्योगमुख बाजारपेठ बनला आहे.

आपल्या देशाने मेकीन इंडिया ,मुद्रा योजना यासारख्या अनेक उपक्रम हाती घेतले आहे जे इच्छुक आणि युवा भारतीयांना उद्योजक बनण्यासाठी प्रोत्साहित करतात .युवा उद्योजकतेला चालना देण्यासाठी भारत सरकारने धोरणात्मक दृष्ट्या योजनाबद्ध पुढाकार घेतला आहे. जिल्हानुसार उद्योजकता सुलभ करण्यासाठी प्रधानमंत्री कौशल्य केंद्राचे रूपांतर उद्योजकता केंद्रामध्ये करण्यात आले आहे जे इच्छुक उमेदवारांना प्रशिक्षण आणि मार्गदर्शन प्रदान करतात. करिअरचा पर्याय आणि अर्थव्यवस्था विकासान म्हणून उद्योजकता हे आत्मविश्वास आणि आर्थिक सक्षमीकरण वाढवण्यासाठी एक मजबूत साधन म्हणून उदयाला आलेले आहे .उद्योजक आणि लहान उपक्रमांच्या उदयामुळे स्थिर विकास दर आणि वाढत्या बेरोजगारीच्या दरावर यशस्वीरित्या परिणाम झालेला दिसून येतो याचे मूलभूत फायदे आणि या फायद्यांमुळे बरेच लोक विशेषतः युवती उद्योजकतेचा एक व्यवहार्य करिअर पर्याय म्हणून विचार करत आहे. जेथे नियमित नोकरीच्या संधी तरुण वर्गांच्या गरज आणि अपेक्षा दोन्हीही विकसित करण्यात अपयशी ठरतात उद्योजकतेचा मार्ग निवडल्याने केवळ उद्योजकांनाच रोजगार मिळत नाही तर
त्यांच्या उपक्रमामध्ये काम करणाऱ्या इतरांनाही रोजगार मिळतो विविध क्षेत्रातील संधींपैकी खाद्यपदार्थाच्या व्यवसायाला भरपूर संधी उपलब्ध आहेत.

**उद्देश** -

1) भारतातील अन्न क्षेत्रातील उद्योजकतेवर प्रभाव टाकणाऱ्या घटकांचा अभ्यास करणे.
2) अन्न उद्योजकता आणि महिला सक्षमीकरण यांचा अभ्यास करणे.
3) महिलांसाठी अन्न उद्योजकांमधील संधीचा अभ्यास करणे.
4) अन्न उद्योजकतेतील आव्हानांचा अभ्यास करणे.

5) महिला सक्षमीकरणात अन्न उद्योजकतेचा वाटा याचा अभ्यास करणे.

**संसोधन पद्धती –**

सदर संशोधनात तथ्य संकलनाच्या दुय्यम स्त्रोतांचा वापर केला आहे.

**माहितीचे विश्लेषण-**

भारतामध्ये युवा उद्योजकता संस्कृतीची जाणीव निर्माण करण्याची आवश्यकता आहे विशेषतः अशा प्रदेशात जिथे सरकारी नोकऱ्यांची पारंपारिक आकांक्षा तरुण पिढीच्या मानसिकतेवर अधिराज्य गाजवीत आहे. दरवर्षी मोठ्या संख्येने युवा पदवीधरांना नोकरी देण्याची सार्वजनिक क्षेत्रात मर्यादित क्षमता आढळून येते या अडथळयांमुळे उच्च स्पर्धा, दीर्घ प्रतिक्षा कालावधी आणि कमी रोजगार इत्यादी अडचणींना तोंड द्यावे लागते. युवा स्टार्टअप संस्कृतीला चालना दिल्यामुळे नोकरीच्या अनेक संधी निर्माण होऊ शकतात आणि एकाच रोजगार स्त्रोतावर अवलंबून असलेल्यांची संख्याही कमी होऊ शकते. महिला उद्योजकतेद्वारे रोजगार संधीना गती मिळू शकते याद्वारे तरुण महिला व इतर असुरक्षित गटांना सक्षम बनवण्यात सरकारच्या वचनाबद्धतेत याचा मोठा वाटा ठरू शकतो यामध्ये नव उपक्रमांना चालना देण्यासाठी स्टार्टअप आणि उद्योजकता निर्माण करण्यासाठी एक गतिमान परिसंस्था निर्माण करून सक्षम करणे हे त्याचे मुख्य उद्देश ठरू शकतो. युवा महिला उद्योजकता हे एक मजबूत परिसंस्था निर्माण करण्याच्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल आहे जे नव उपक्रम व उद्योजकतेला समर्थन देते याद्वारे कौशल्य व उद्योजकतीय मानसिकता युवा वर्गामध्ये वाढवून त्यांना सक्षम करण्याचा प्रयत्न करता येतो. अलीकडच्या काळात उद्योजकता हा युवा वर्गामध्ये चर्चेचा विषय बनला आहे भारतातही स्टार्ट अप इंडिया मेक इन इंडिया ने उद्योजकता क्षेत्रात तरुण महिलांमधे आत्मविश्वास निर्माण केला आहे. अन्न उद्योजकता ही देशाच्या अर्थव्यवस्थेचा प्रमुख चालक बनली आहे.

- महिला सक्षमीकरणाचे महत्त्व:

महिलांना सक्षम बनवणे हे कोणत्याही समाजाच्या सामाजिक व आर्थिक प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहे. अन्न उद्योगाच्या माध्यमातून, महिलांना आणि युवांना स्वयंसहाय्य होण्याची संधी मिळू शकते, कारण अन्न उद्योग जास्त प्रमाणात लहान आणि कुटुंब आधारित उद्योग प्रदान करतो. हे उद्योग त्यांच्या स्वतःच्या व्यवसायाच्या आधारावर प्रगती करण्यास, कौशल विकास, आर्थिक स्वातंत्र्य आणि सामाजिक प्रतिष्ठा मिळवण्यास मदत करू शकतात. महिला सक्षमीकरण हे एक अत्यंत महत्त्वाचा सामाजिक आणि आर्थिक मुद्दा आहे. महिलांच्या जीवनात सुधारणा करण्यासाठी त्यांना अधिकार, संधी आणि संसाधने मिळवून देणारी प्रक्रिया महिला सक्षमीकरण म्हणून ओळखली जाते. महिलांच्या सक्षमीकरणासाठी विविध क्षेत्रांमध्ये अन्न उद्योजकतेचा महत्त्वाचा सहभाग असतो. अन्न उद्योजकतेचे उद्दिष्ट समाजातील विविध समस्यांवर उपाय शोधणे आहे आणि उद्योजकतेचे एक महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे ते नफा मिळवण्याचा उद्देश न ठेवता सामाजिक बदल घडवण्यासाठी कार्य करणे. अन्न उद्योजकतेचा महिला सक्षमीकरणासाठी महत्त्व आहे. सामाजिक आणि आर्थिक समावेशन अन्न उद्योजकता महिलांना रोजगाराची संधी

देते आणि त्यांना त्यांची आर्थिक स्थिती सुधारण्यास मदत करते. अनेक अन्न उद्योजक प्रकल्प महिलांना कुटुंब आणि समुदायाच्या आर्थिक विकासात योगदान देण्याची संधी देतात.

अन्न उद्योजकतेद्वारे महिलांना स्वतःचे व्यवसाय सुरु करण्याची प्रेरणा मिळते. यामुळे त्या आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र होतात आणि त्यांच्या जीवनशैलीत सकारात्मक बदल होतो.

शिक्षण आणि कौशल्य विकास: अन्न उद्योजकतेचे अनेक प्रकल्प महिलांना व्यावसायिक कौशल्ये आणि ज्ञान देण्यासाठी कार्यरत असतात. हे कौशल्ये महिलांना त्यांच्या व्यवसायात यशस्वी होण्यासाठी मदत करतात. संघटनात्मक समावेश महिलांसाठी अन्न उद्योजकतेद्वारे असलेल्या नेटवर्किंग संधी त्यांना इतर महिलांसोबत कनेक्ट होण्याचा आणि एकमेकांची मदत करण्याचा

मार्ग प्रदान करतात. या प्रकारच्या संघटनांमुळे महिलांना अधिक आत्मविश्वास आणि समर्थन मिळते. समाजातील बदल अन्न उद्योजकता महिला सक्षमीकरणाच्या दिशेने मोठ्या प्रमाणात कार्यरत आहे. हे प्रकल्प समुदायात बदल घडवून आणतात आणि महिलांच्या स्थानावर आणि कुटुंबातील त्यांच्या भूमिकेवर जागरूकता निर्माण करतात.

- अन्न उद्योगाची व्याख्या आणि महत्त्व -

अन्न उद्योग म्हणजे विविध प्रकारच्या अन्नपदार्थांचा उत्पादन, प्रक्रिया, पॅकेजिंग आणि विपणन हा संपूर्ण प्रक्रियांचा समावेश. या उद्योगाच्या दृष्टीने भारत हा एक महत्वाचा केंद्र आहे कारण इथे कृषी आधारित उद्योग मोठ्या प्रमाणावर आहे. अन्न उद्योगाच्या माध्यमातून महिला व युवकांना मोठ्या प्रमाणावर रोजगार, उद्योजकता, आणि कौशल्य विकासाचे संधी मिळतात.

**भारतात अन्न उद्योजकतेसाठी संधी -**

भारतातील खाद्य उद्योग हा अन्न उद्योगांसाठी विस्तृत संधी उपलब्ध करून देतो आणि सर्जनशीलता, नाविन्य व्यावसायिक कौशल्य यांच्या योग्य संयोजनाने उद्योजक या रोमांचक बाजारपेठेत प्रवेश करू शकतात. भारतातील प्रत्येक प्रदेशाची स्वतःची अशी खास पाककृती आणि चव आहे हेच अन्न उद्योजकांना अनेक संधी देतात एका विशिष्ट पाककृति मध्ये माहीर होऊन ते

रेस्टॉरंट आणि वितरण सेवा देऊ शकतात. स्ट्रीट फूड हा भारतीय खाद्य संस्कृतीचा एक महत्त्वाचा भाग आहे आणि खाद्य उद्योजक स्वतःची फूड कार किंवा स्टॉल सुरू करून याचा फायदा घेऊ शकतात. कमी स्टार्टअप खर्च आणि बंदिस्त प्रेक्षकांसह स्ट्रीट फूड हा उत्तम मार्ग बनवू शकतो. अन्न उद्योगात सुरुवात करण्यासाठी आणि हेल्दी खाण्याच्या प्रवृत्तीमुळे अन्न उद्योजक आरोग्य आणि निरोगी अन्न विभागात संदेश शोधू शकतात यामध्ये आरोग्यदायी जेवण वितरण सेवा देणे किंवा सेंद्रिय तसेच शाकाहारी पदार्थांसाठी विशेष स्टोअर सुरू करणे इत्यादींचा समावेश होऊ शकतो.

- अन्न उद्योजकतेद्वारे सक्षमीकरणाची शक्यता -

महिलांसाठी रोजगार व स्वयंसहाय्यता -

अन्न उद्योगात महिलांसाठी विविध संधी निर्माण होऊ शकतात. उदाहरणार्थ, महिलांना अन्न प्रक्रिया, निर्माण, पॅकिंग आणि वितरण यामध्ये काम करण्याची संधी मिळू शकते. महिलांना घरच्या कामांपासून बाहेर पडून त्यांना आर्थिक स्वातंत्र्य मिळवता येईल.

कौशल विकास -

अन्न उद्योगामध्ये काम करणाऱ्या महिलांसाठी आणि युवांसाठी विविध प्रकारचे प्रशिक्षण आणि कौशल विकासाचे कार्यक्रम उपलब्ध असतात. अन्न प्रक्रिया, अन्न सुरक्षा, गुणवत्ता नियंत्रण, विपणन, आणि उत्पादन व्यवस्थापनासंबंधी ज्ञान मिळवून ते स्वतःच्या व्यवसायाला चालना देऊ शकतात.

स्टार्टअप्स आणि लघुउद्योगांची निर्मिती -

अन्न उद्योगाच्या क्षेत्रात महिलांना आणि युवांना स्वयंपूर्ण छोटे उद्योग सुरू करण्याची संधी मिळू शकते. मेक इन इंडिया आणि, स्टार्टअप इंडिया सारख्या योजनांचा वापर करून, अन्न उत्पादनाचे छोटे उद्योग सुरू करून ते रोजगारनिर्मिती व व्यवसायिक वाढ साधू शकतात.

आर्थिक स्वातंत्र्य आणि सशक्तिकरण अन्न उद्योगातील महिलांसाठी, कुटुंबाच्या आर्थिक स्थितीला एक नवा आयाम देण्याची संधी आहे. स्वयंपूर्ण असणाऱ्या महिलांना घराच्या आर्थिक निर्णयांमध्ये अधिक सहभाग मिळतो, जे त्यांच्या सामाजिक दर्ज्याला उंचावते.

आव्हाने आणि उपाय यद्यपि अन्न उद्योग हा एक महत्त्वाचा क्षेत्र आहे, तरी महिलांना यामध्ये संधी मिळवण्यासाठी काही अडचणी असू शकतात. यामध्ये मुख्य अडचणी म्हणजे शिक्षणाची कमतरता, कौशल प्रशिक्षणाची कमी सुविधा, पैशाची कमतरता, वयाचे भेदभाव आणि सांस्कृतिक अडथळे, आर्थिक अडचणी महिलांना सुरवातीच्या टप्प्यात आर्थिक गुंतवणूक मिळवणे कठीण असू शकते. बँकांकडून कर्ज मिळवणे, विक्री आणि विपणनासाठी आवश्यक फंड्स इत्यादी आव्हानांचा सामना करावा लागतो.

प्रशिक्षणाची आवश्यकता –

अन्न उत्पादकांना योग्य प्रशिक्षणाची आवश्यकता असते. महिलांसाठी सक्षम प्रशिक्षण कार्यक्रम सुरू करणे आवश्यक आहे जेणेकरून त्या अन्न प्रक्रिया आणि उत्पादनाच्या विविध पैलूंमध्ये पारंगत होऊ शकतात. महिलांसाठी उपयुक्त कौशल्य प्रशिक्षण कार्यक्रमांची आवश्यकता आहे. अनेक ठिकाणी आवश्यक कौशल्य प्रशिक्षण उपलब्ध नाही. समाजातील मानसिकता काही समुदायांमध्ये महिला उद्योजकतेला विरोध असू शकतो. रूढी, परंपरा आणि समाजातील मानसिकता महिला सक्षमीकरणाच्या प्रक्रियेत अडथळा आणू शकतात. संपत्तीची विषमता ग्रामीण आणि शहरी भागांमधील आर्थिक विषमता देखील महिलांच्या अन्न उद्योजकतेच्या कामावर परिणाम करू शकते. महिलांना समान सधी मिळवून देणे आवश्यक आहे.

मार्गदर्शन आणि नेटवर्किंग-

मार्गदर्शन सल्ला आणि बाजारपेठेतील अंतर दृष्टीसाठी युवा उद्योजक व महिला उद्योजकांना अनुभवी अन्न उद्योग व्यवसायांशी जोडणे. स्थानिक उत्पादनांवर लक्ष केंद्रित करणे,

शेतकऱ्यांना आधार देण्यासाठी आणि शाश्वत अन्नप्रणालीला प्रोत्साहन देण्यासाठी स्थानिक पातळीवर पिकवलेल्या घटकांचा वापर करून अन्न उद्योगास प्रोत्साहन देणे.

**महिला सक्षमीकरण -**

महिला सक्षमीकरण ही संकल्पना महिलांना समानतेच्या आणि विकासाच्या संधी मिळवून देण्याच्या प्रक्रियेतील महत्त्वपूर्ण बाब आहे. अन्न उद्योगाच्या क्षेत्रात महिलांना निमंत्रित करून त्यांना अधिक सशक्त व सक्षम बनवता येते.

- महिलांसाठी अन्न उद्योगाच्या क्षेत्रातील संधी -

स्व-सहायता गट (SHGs): महिला स्व-सहायता गटांचे (Self-Help Groups) महत्त्व वाढले आहे. या गटांच्या माध्यमातून महिलांना अन्न उद्योगातील उत्पादन, प्रक्रिया, आणि विपणन कसे करावे याचे प्रशिक्षण दिले जाते. महिला शेतकरी व उद्योजिका

महिला शेतकऱ्यांना अन्न उत्पादनातील सशक्त भूमिका दिली जाते. उदाहरणार्थ, महिलांना अन्न उत्पादक संस्था आणि अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये सहभाग वाढवणे.

अन्न प्रक्रिया उद्योग: महिलांना अन्न प्रक्रियेत, त्याचबरोबर अन्न सुरक्षा आणि गुणवत्तेच्या दृष्टीने कार्य करण्याच्या संधी उपलब्ध होतात. सरकारी योजनांची मदत: महिला उद्योजिकांना प्रोत्साहन देण्यासाठी सरकार विविध योजना व सबसिडी प्रदान करते.

युवतींचे सक्षमीकरण: आजच्या काळात युवा वर्ग ही अन्न उद्योगाच्या क्षेत्रातील महत्त्वाची व्यक्ती आहे. यामध्ये वेगवेगळया तंत्रज्ञानाचा वापर, नविन विचार, आणि उद्योजकतेचा समावेश आहे.

युवतींसाठी उद्योजकतातील संधी: कृषी तंत्रज्ञान युवा शेतकऱ्यांसाठी नवे तंत्रज्ञान व आधुनिक पद्धतींचे वापर करून अन्न उत्पादनाची क्षमता व गुणवत्तेत सुधारणा केली जाऊ शकते. अन्न उद्योगातील नवउद्योजकता अन्न प्रक्रियाकरण, कृषी व अन्न आधारित स्टार्टअप्सद्वारे युवा उद्योजकता सशक्त होऊ शकते.

शिक्षण व प्रशिक्षण कार्यक्रम : अन्न उद्योगात प्रशिक्षण आणि कौशल्य विकासावर जोर दिला जातो. अनेक सरकारी आणि खाजगी संस्थांनी यासाठी शिबिरे आणि कार्यशाळा आयोजित केली आहेत. नोकरीच्या संधी, अन्न उद्योगातील विविध क्षेत्रांमध्ये युवांसाठी रोजगाराचे विविध संधी उपलब्ध आहेत जसे की विपणन, वितरण, आणि उत्पादनाच्या क्षेत्रांमध्ये

उद्योजकीय मानसिकता : युवा पिढीमध्ये नाविन्यपूर्ण कल्पनांचा वापर उद्योगाच्या स्वरूपात करणे आणि जोखीम घेण्याची संस्कृती वाढविणे.

अन्नसुरक्षा: स्थानिकांना उत्पादन आणि वितरण नेटवर्कला पाठिंबा देऊन पौष्टिक अन्नाची उपलब्धता सुधारणे आणि देशाचा विकासाला हातभार लावणे.

- अन्न उद्योगात सक्षमीकरणासाठी येणाऱ्या अडचणी -

अवधीनुसार तंत्रज्ञानाचा वापर: अन्न उद्योगाच्या क्षेत्रात नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करणे आवश्यक आहे, परंतु ग्रामीण भागात महिलांना व युवांना तंत्रज्ञानाची माहिती मिळवणे एक आव्हान ठरू शकते.

आर्थिक अडचणी : सुरुवातीला संसाधनांची कमतरता असू शकते, ज्यामुळे उद्योग सुरू करणे कठीण होऊ शकते.

समाजातील भेदभाव: काही सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कारणांमुळे महिला व युवा वर्गाला समज आणि कौशल्यांच्या क्षेत्रात समान संधी मिळत नाहीत.

**निष्कर्ष**

अन्न उद्योगाच्या माध्यमातून महिला आणि युवकांचा सक्षमीकरण होणे शक्य आहे. या क्षेत्रात काम करणे त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवते तसेच समाजातील त्यांचा सहभाग वाढवतो. सरकार, सामाजिक संस्था, आणि इतर संबंधित घटकांनी या क्षेत्रात अधिक सहाय्य व प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. अन्न उद्योगाने महिलांना आणि युवा वर्गाला सशक्त बनवण्यास खूप महत्त्वाची भूमिका बजावली आहे. अन्न उद्योगाचे वैशिष्ट्य म्हणजे त्यात काम करणाऱ्या प्रत्येकाला विविध संधी मिळतात. योग्य मार्गदर्शन, कौशल विकसन, आणि वित्तीय सहाय्याने,

महिलांना आणि युवांना या उद्योगाच्या माध्यमातून प्रगती करण्याची आणि स्वयंसहाय्य होण्याची संधी मिळू शकते. यामुळे केवळ त्यांच्या जीवनातील स्थिती सुधारत नाही, तर एकूणच देशाच्या सामाजिक आणि आर्थिक प्रगतीला चालना मिळते.

**संदर्भसूची** -

1. डॉ. उज्वला वैरागडे / प्रा. विद्युलता मुळे सामुदायिक विकास विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण विद्यापीठ पब्लिकेशन औरंगाबाद.
2. Kumar.V.Chitra ,J.(2013). Women Entrepreneurs In India - Emerging Issues And Challenges. International Journal of Development Research. Vol. 3, Issue, 04, pp.012-017. Rawal, V and Saha, P.(2015). "Women's Employment in India: What do Recent NSS Surveys of Employment and Unemployment Show?", SSER Monograph 15/1, Society for Social and Economic Research, New Delhi (available at: http://archive.indianstatis tics.org/sserwp/sserwp1501.pdf). Sharma.A,Saha.S,(2016)., Female Employment Trends in India: A Disaggregated Analysis
3. Abhishek Goel, N. V. (2006). ATTITUDES OF THE YOUTH TOWARDS
4. ENTREPRENEURS AND ENTREPRENEURSHIP: A CROSS CULTURAL (2021). Agri‐food sector and entrepreneurship during the <scp>COVID</scp> ‐19 crisis: